वेळ : ३ तास | १०वी– मराठी अक्षरभारती – द्वितीय भाषा | गुण : ८०

## विभाग १– गद्य

---

**सूचना :**

१. सूचनेनुसार आकलन कृती व व्याकरण यामधील आकृत्या काढाव्यात.

२. आकृत्या पेननेच काढाव्यात.

३. उपयोजित लेखनातील कृतींसाठी (सूचना,निवेदन) आकृतीची आवश्यकता नाही. तसेच या कृती लिहून घेऊ नयेत.

४. विभाग ५– उपयोजित लेखन .५(अ) सारांशलेखन या घटकासाठी गद्य विभागातील .१(इ) अपठित उतारा वाचून त्या उताऱ्याचा सारांश लिहावयाचा आहे.

५. स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखन नियमांनुसार लेखनाकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

---

### पठित गद्य

**प्रश्न १ (अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** **(१२)**

(१) कोण ते लिहा.

(i) तन–मन–धनानं फुलवलेली कर्मभूमी सोडण्याच्या कल्पनेने हळवे झाले -------

(ii) दोनचे टोले दिले ----------

(iii) 'चुडीवाला ... चुडीवाला ...' म्हणून धावत धावत जमणार होत्या -------

''नाही रघुभैया ... तपोवनच आता दाजी साहेबांच्या हाती राहील नाही. हे कळलं, तेव्हापासून मन नाही लागत धंदा करायला. आता तपोवनाचं काय होईल रे रघुभैया ? केवढी मोठी वसाहत ! किती रोगी ! आता त्यांची कशी काळजी घेतली जाईल रे ? आणि आयुष्याचं मोल देऊन तन–मन–धनानं फुलवलेली ही कर्मभूमी सोडण्याच्या कल्पनेन दाजीसाहेबाना काय वाटलं असेल बरं ?'' अब्दुल विलक्षण हळवा झाला.

देवळातल्या पहारेकऱ्याने दोनचे टोले दिले. शन्नू घोरत होती. अन्वर गाढ झोपला होता. अब्दुल उठला. अगदी हलकेच. कोपऱ्यात बांगड्यांच्या पेटीवर ठेवलेल्या पिशवीतील एकेक वस्तू बाहेर काढू लागला. पावडरचा डबा, रुमाल, रिबिनी, पिना, सोनेरी बांगड्या, साध्या बांगड्या, नायलॉनच्या बांगड्या ... संक्रांतीला हे सारे तपोवनात नेणार होता. तिथे 'चुडीवाला ... चुडीवाला ...' म्हणून स्त्रिया, मुलीबाळी धावत धावत त्याच्या जवळ जमणार होत्या... काही काळ तरी सारे विसरुन हसणार होत्या आणि त्यांचे हसू बघून अब्दुल मनोमन सुखावणार होता, पण आता... आता सारे संपले होते. स्वतःसाठी सारेच जगतात, पण

दुसऱ्यासाठी जगण्यातला आनंद ? त्या आनंदाचे सुख वर्षातून फक्त दोनदाच अब्दुल अनुभवायचा. पण आता? आता तेही मिळणार नव्हते. एखाद्या वस्त्राचा एकाएकी रंग उडून जावा तशी त्याची जीवनेच्छा एकाएकी उडून गेली.

त्या साऱ्या वस्तूंकडे बघता बघता अब्दुलचे डोळे पाण्याने काठोकाठ भरुन आले. त्यात तपोवनाचा परिसर विरघळत होता....हळूहळू...रात्र उत्तरणीला लागली होती.

(२) आकृतिबंध पूर्ण करा. (२)

बांगड्यांच्या पेटीवर ठेवलेल्या पिशवीतून अब्दुलने बाहेर काढलेल्या वस्तू

(३) स्वमत – (३)

'उद्योगधंदा' यशस्वी करण्यासाठी व्यक्तीमध्ये कोणते गुण आवश्यक असतात असे तुम्हाला वाटते ?

**प्रश्न १. (आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

(१) आकृती पूर्ण करा. (२)

निरंजनला या प्रश्नांची उत्तरे धडाधड येत होती

मामा गेला तो पुन्हा परतला नाही मात्र लहानगा निरंजन मावशीच्या घरी प्रामाणिकपणे काम करायचा. घरातल्या सर्वांशी त्याने जमवून घेतलं आणि शाळेत नाव दाखल केलं. मावशीची परिस्थिती यथातथाच असल्याने निरंजन वार लावून जेवायचा. पहिल्याच वर्षी त्याची अभ्यासातली प्रगती पाहून भडसावळे गुरुजींनी त्याला थोरामोठ्यांच्या घरी वार लावून दिले. दररोज एकाच्या घरी दुपारी निरंजन पाहुणा म्हणून जेवायला जायचा, मग तिथून शाळेत, संध्याकाळी मात्र मावशीकडे जे काही मिळेल त्यावर राहायचा. सकाळी लवकर उठून घरातली, गोठ्यातली सारी कामं आटपून अभ्यासाला बसायचा. गुरुजींवर श्रध्दा ठेवायचा आणि परीक्षेत पहिला नंबर पटकवायचा. त्याच्या वह्या–पुस्तकांचा खर्च भडसावळे गुरुजीच करायचे.

गुरुजींनी त्याला सांगितलं, की 'जोपर्यंत तुझा पहिला नंबर आहे, तोपर्यंतच मी सारा खर्च करीन आणि वारही लावून देईन. नाहीतर नाही.' गुरुजीचं हे वाक्य लक्षात ठेवून निरंजन झटून अभ्यास करायचा.

आज नागरिकशास्त्राचा अभ्यास करत असताना आधीचे सगळे पेपर्स चांगले गेले असल्याने तो मनोमन खुश होता. नागरिकांची कर्तव्ये कोणती ? उत्तम नागरिक कुणाला म्हणावे ? लोकसभा म्हणजे काय? ग्रामपंचायतीचा प्रमुख कोण असतो ? साऱ्या प्रश्नांची उत्तरे त्याला येत होती. अभ्यास करता करता किती वेळ लोटला कुणास ठाऊक. निरंजन ताडकन उठून उभा राहिला. नऊ वाजून गेले होते. साडेदहाची परीक्षा. त्याआधी देशमुखांकडे जायचं होतं. केवढंतरी लांब चालायचं होतं. भराभर आवरून तो निघाला.

(२) शब्दजाल पूर्ण करा. (१)

(i)

| निरंजनची अपार श्रध्दा | मामाने निरंजनला सोडले |
|---|---|
| ↓ | ↓ |
| | |

(ii)

| निरंजन सकाळी उठून कामे करायचा | |
|---|---|
| ↙ | ↘ |
| | |

(३) स्वमत – (३)

'श्रमाचे महत्त्व' आपल्या शब्दांत व्यक्त करा.

## अपठित गद्य

**प्रश्न १. (इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

१) आकृती पूर्ण करा. (२)

| निसर्गाच्या प्रकोपाचे चार प्रकार | | | |
|---|---|---|---|
| ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| | | | |

निसर्गाचा प्रकोप झाल्याच्या अनेक बातम्या आपण ऐकतो व वाचतो. धरणीकंप, ज्वालामुखी, प्रचंड वादळ, अतिवृष्टीमुळे होणारे जलप्रलय निसर्गकोपाचे हे काही ठळक प्रकार आहेत. असा कोणताही प्रकोप झाला की फार मोठा विध्वंस होतो. हजारो लोक प्राणाला मुकतात. लाखो लोकांचे जीवन उद्ध्वस्त होते. मोठ–मोठ्या शहरांची पार वाताहत होते. पण खरोखरीच मानव इतका दुबळा आहे का? तसा तो दुबळा असता तर त्याने विविध क्षेत्रांत जो निसर्गावर विजय मिळवला, तो कसा मिळवला असता? श्रमाने, प्रेमाने बुध्दिचातुर्याने मानवाने निसर्गाला जिंकले. जमिनीतून विविध पिके काढली. जमिनीच्या व समुद्राच्या पोटातील संपत्ती शोधून काढली. विज्ञानाच्या जोरावर नगरे वसविली. तेनसिंग हिमालयावर चढून एव्हरेस्टच्या शिखरावर पोहोचला, तर नील चंद्रावर उतरला, मग मानव मानव दुबळा कसा ?

(२) शब्दजाल पूर्ण करा. (१)

(i) मानवाने निसर्गाला जिंकले
→ [ ] [ ]

(ii) हिमालयावर पोहोचलेला → [ ]
चंद्रावर उतरलेला → [ ]

**विभाग २: पद्य**

**प्रश्न २. (अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

(१) आकृती पूर्ण करा. (२)

योगी पुरुषाची चार वैशिष्ट्ये
→ [ ] [ ] [ ] [ ]

जेवी चंद्रकिरण चकोरांसी । पांखोवा जेवी पिलियांसी ।
जीवन जैसे कां जीवांसी । तेवीं सर्वासी मृदुत्व ।।
जळ वरिवरी क्षाळी मळ । योगिया सबाह्य करी निर्मळ ।
उदक सुखी करी एक वेळ । योगी सर्वकाळ सुखदाता ।।
उदकाचें सुख तें किती । सर्वेचि क्षणे तृषितें होती ।
योगिया दे स्वानंदतृप्ती । सुखासी विकृती पैं नाही ।।
उदकाची जे मधुरता । ते रसनेसीचि तत्त्वतां ।
योगियांचे गोडपण पाहता । होय निवविता सर्वेद्रियां ।।
मेघमुखें अधःपतन । उदकाचें देखोनि जाण ।
अध:पाते निवती जन । अन्नदान सकळांसी ।।
तैसे योगियासी खालुतें येणें । जे इहलोकीं जन्म पावणे ।
जन निववी श्रवणकीर्तनें । निजज्ञानें उद्धरी ।।

(२) प्रत्येकी एका वाक्यात उत्तर लिहा. (२)

(i) चंद्रकिरण पिऊन जगणारा पक्षी.

(ii) पाण्याची गोडी फक्त कळते.

(३) प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ लिहा. (२)

(i) चंद्र– (ii) मधुर–

(iii)) मृदु– (iv) रसना –

(४) मेघमुख अधःपतन। उदकाचे देखोनि जाण । (२)

अधःपातें निवती जन । अन्नदान सकळांसी, या ओळींचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.

**प्रश्न २.(आ) खालील मुद्दयांच्या आधारे कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील कृती सोडवा. (८)**

'अंकिला मी दार तुझा' किंवा 'दोन दिवस'

(१) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री

(२) प्रस्तुत कवितेचा विषय

(३) प्रस्तुत कवितेतील दिलेल्या दोन ओळींचा सरळ अर्थ लिहा.

भुकेलें वत्सरावें ।
धेनु हुंबरत धांवे ।।

**किंवा**

दुनियेचा विचार हरघडी केला, अगा जगमय झालो
दुःख पेलावे कसे, पुन्हा जगावे कसे, याच शाळेत शिकतो

(४) प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश. (२)

(५) प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडत्याचे कारण. (२)

## विभाग ३: स्थूलवाचन

**प्रश्न ३. खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** **(६)**

(१) टीप लिहा – सग्वारो कॅक्टस

(२) मेटलायझिंग प्रक्रियेवर काम न होण्यामागची कारणे कोणती असावीत असे तुम्हांला वाटते?

(३) व्युत्पत्ती कोशाचे कार्य लिहा.

## विभाग ४: भाषाभ्यास

**प्र. ४. (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती.**

(१) खालील वाक्यांचा प्रकार ओळखा. (२)

(i) केवढे विराट नृत्य आहे जीवना

(ii) तुझे आमंत्रण आम्ही का नाकारू?

(२) कंसातील सूचनेनुसार वाक्य रूपांतर करा. (२)

(i) हे चित्र सुंदर आहे. (उद्गारवाचक करा.)

(ii) मुले अभ्यास करतात. (आज्ञार्थी करा.)

(३) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यांत उपयोग करा. (फक्त दोन) (२)

(i) हातभार लावणे

(ii) अंगाचा तिळपापड होणे

(iii) रममाण होणे

**प्रश्न ४. (आ) भाषिक घटकांवर आधारित कृती.**

(१) शब्दसंपत्ती

(i) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा. (१)

(अ) गोड– (ब) फूल–

(ii) विरुध्दार्थी शब्द लिहा. (१)

(अ) दृश्य (ब) गरीब

(iii) खालील शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा. (१)

(अ) पाहण्यासाठी जमलेले लोक –

(iv) लिंग बदला. (१)

(अ) विद्यार्थी – (ब) नायक –

(२) लेखननियमांनुसार लेखन.

(i) खालीलपैकी अचूक शब्द ओळखा. (२)

(अ) किणारा /कीनारा /किनार / किनाआरा

(ब) परन्तू / परंतु / परंतू / पंरतू

(३) विरामचिन्हे.

(i) खालील वाक्यांत योग्य विरामचिन्हांचा उपयोग करा. (२)

(अ) आंबा चिकू ही फळे गोड असतात.

(ब) ही बस कुठे जाते

## विभाग ५: उपयोजित लेखन

प्रश्न ५. (अ) (१) पत्रलेखन. (६)

खालील निवेदन वाचा व त्याखालील कोणतीही एक कृती सोडवा.

तुमच्या शाळेसमोर कचराकुंडी, आरोग्याला धोका, दुर्गंधी पसरली

↓

विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने

| | | |
|---|---|---|
| माननीय आरोग्य अधिकारी,आरोग्य विभाग, सांगली, नगर परिषद यांना शाळेसमोरील कचराकुंडी विनंती करणारे पत्र लिहा. | किंवा | सांगली, नगर परिषद, आरोग्य अधिकारी यांनी स्वरित कार्यवाही केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करणारे पत्र लिहा. |

**किंवा**

(२) सारांश लेखन. (६)

विभाग –१ गद्य विभागातील प्र.१ (इ) मधील अपठित उताऱ्याचा १/३ एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

**प्रश्न ५.(आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** (१०)

(१) जाहिरात लेखन (५० ते ६० शब्द) (५)

सहलीसाठी जाणाऱ्या यात्रा कंपनीची जाहिरात खालील मुद्दयांच्या आधारे तयार करा.

कंपनीचे नाव, कंपनीची वैशिष्ट्ये, पत्ता.

(२) बातमी लेखन (५० ते ६० शब्द) (५)

एच. एम. पब्लिक स्कूल
अंधेरी, मुंबई ४०००५८
विद्यार्थ्यांचा संगीत कार्यक्रम
नृत्य, मिमिक्री नाट्य
प्रमुख पाहुणे: कैप्टन विजय अवसरमोल
स्थळ: शाळा सभागृह
सर्वांना आमंत्रण

**५ सप्टेंबर**

**संध्याकाळी ४ ते ६**

शिक्षक दिन संपन्न झाल्याची बातमी तयार करुन लिहा.

(३) कथालेखन (८० ते ९० शब्द) (५)

घटनाक्रम लक्षात घेऊन कथा तयार करा.

| | |
|---|---|
|  | **मुद्दे:** दोन मित्र – जंगलातून प्रवास – अचानक जंगलात अस्वलाचे दिसणे – एक मित्र दुसऱ्या मित्राला सोडून झाडावर चढणे – दुसरा मित्र जमिनीवर मेल्यासारखा पडून राहतो– अस्वलाचे येणे, हुंगणे – मित्राचे उत्तर. |

**प्रश्न ५. (इ) लेखनकौशल्य (१०० ते १२० शब्द)** **(८)**

**खालील लेखन प्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा.**

**(१) प्रसंगलेखन**

**महाराष्ट्र दिनाच्या दिवशी साजरा झालेल्या सोहळ्याचे प्रसंगलेखन करा.**

राजाराम पेठ येथे साजरा झालेला
महाराष्ट्र दिन सोहळा

आयोजक – वीर मराठा मंडळ

दिनांक १ मे, २०१९

– प्रमुख पाहुणे–
विभाग प्रमुख श्री. एकनाथ काळे
अध्यक्ष श्री. जितेंद्र महाजन

वेळ:सकाळी ८ वाजता

**स्थळ**– राजाराम पेठ, कोल्हापूर



**********